महाराष्ट्र विकास सेवा गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या विनंती बदल्या.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

शासन आदेश क्रमांकः मविसे-१०१८/प्र.क्र.७९/२०१८/आस्था-३ (अ)
मंत्रालय, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.
तारीख: ०७ मार्च, २०१९.

शासन आदेश :

सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदींनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदींनुसार श्री.बी.डी. भोगे, सहायक गट विकास अधिकारी (मग्रारोहयो), अलिबाग, जिल्हा परिषद, रायगड यांची सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीवर्धन, जि.रायगड या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

२. श्री.भोगे यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरीत स्वीकारावा. तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : सीडीआर १०८२/ २५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

३. संबंधित विभागीय आयुक्त/ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री.भोगे यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांच्या नियुक्तीच्या जागी तात्काळ रुजू होण्यास सांगावे. तसेच श्री.भोगे यांनी नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व पदभार स्विकारल्याचा दिनांक शासनास कळवावा. श्री.भोगे विहित कालावधीत नियुक्तीच्या पदावर रुजू न झाल्यास संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्तांमार्फत शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७१०५९५४७३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Natha Savane

Digitally signed by Rajendra Natha Savane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=0a2ac5ab6ca0075cc776c90ec03925f2eb8727640eacf311beb6f68d63939303, serialNumber=f049989dbbef93340e9edd88af960a0963746d42baa5c948405b62e821529a99, cn=Rajendra Natha Savane
Date: 2019.03.07 11:38:29 +05'30'

(रा.ना.सवने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
३) मा. प्रधन सचिव (ग्राम विकास व पंचायत राज).
४) विभागीय आयुक्त, कोकण.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड.
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड.
७) महालेखापाल- १ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
८) श्री.बी.डी. भोगे, सहायक गट विकास अधिकारी (मग्रारोहयो), अलिबाग, जिल्हा परिषद, रायगड (द्वारा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड)
९) कार्यासन, आस्था-२, ग्राम विकास विभाग
१०) निवड नस्ती.